| (एक)<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर सन 2025-26 |
|---|

| केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (एक)<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील कार्य व कर्तव्य |
|---|

| | |
|---|---|
| 1. कार्यालयाचे नांव | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,छत्रपती संभाजीनगर |
| 2. पत्ता | पानचक्की रोड, घाटी हॉस्पीटलसमोर, छत्रपती संभाजीनगर<br>संपर्क क्रं.0240-2994268<br>Email- abdprodir@rediffmail.com |
| 3. कार्यालय प्रमुख | प्रकल्प संचालक |
| 4. शासकीय मंत्रालयीन विभाग | ग्राम विकास विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई |
| 5. कार्यक्षेत्र | छत्रपती संभाजीनगर जिल्हा - ग्रामीण क्षेत्र |
| 6. विशिष्ट कार्य | केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्न्ती अभियान (MSRLM) या योजनेची अंमलबजावणी करणे. |
| 7. विभागाचे ध्येय धोरण | केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्न्ती अभियान (MSRLM) प्रशासकीय नियंत्रण व संनियंत्रण |
| 8. सर्व संबंधित कर्मचारी | एकूण मंजूर पदे - 08, कार्यरत पदे - 05, रिक्त पदे - 03 |
| 9. कार्य | केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्न्ती अभियान (MSRLM) प्रशासकीय नियंत्रण व संनियंत्रण |
| 10. कामाचे विस्तृत स्वरुप | केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्न्ती अभियान (MSRLM) प्रशासकीय नियंत्रण व संनियंत्रण |
| 11. कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक व वेळा | दुरध्वनी क्रमांक – 0240-2994268<br>कार्यालयीन वेळ–सकाळी 09-45 ते सायं.6.15 पर्यंत |

**(दोन)**
**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (दोन)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्याचा तपशील**

| **अ.क्रं.** | **पदनाम** | **अधिकार** |
|---|---|---|
| 1. | प्रकल्प संचालक | **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे प्रमुख या नात्याने विभागाचया कामकाजावर नियंत्रण** |
| 2. | सहायक प्रकल्प संचालक (वर्ग-2) | **विभागाच्या कामकाजावर नियंत्रण** |
| 3. | कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता | **केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनांवर नियंत्रण ठेवणे** |
| 4. | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | **कार्यालयीन कामकाजासाठी मदत, विभागातील वर्ग-3 कर्मचा-यांकडील कामकाजावर नियंत्रण, विभागातील कर्मचा-यांकडून कार्यालयीन काम करुन घेणे व निगराणी ठेवणे** |
| 5. | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | **नेमुन दिलेली कामे पार पाडणे** |
| 6. | सहायक लेखाधिकारी | **नेमुन दिलेली कामे पार पाडणे** |
| 7. | वरिष्ठ सहायक | **नेमुन दिलेली कामे पार पाडणे** |
| 8. | कनिष्ठ सहायक | **नेमुन दिलेली कामे पार पाडणे** |

**(तीन)**
**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (तीन)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायित्व निश्चित करुन कार्यपध्दतीने प्रकाशन**

| अ.क्रं. | कामाचे स्वरुप | कालावधी | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा लाभ देणे | **6 महिने ते 1 वर्ष** | **शाखा अभियंता<br>प्रोग्रामर<br>डाटा एन्ट्री ऑपरेटर** | |
| 2. | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान **(MSRLM)** अंतर्गत दारिद्रयाचे निर्मूलन करण्यासाठी ग्रामीण गरीबांना एकत्र आणून, त्यांच्या सक्षम संस्था उभारणे, सदर संस्था मार्फत गरीबांना वित्तीय सेवा पुरवणे, गरीबांची व त्यांच्या संस्थाची क्षमता वृध्दी व कौशल्यवृध्दी करणे आणि शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देऊन त्यांना दारिद्रयाच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे. | **जिवनचक्रा नुसार गट स्थापने पासुन 30 महिने कालावधीकरिता विशेष लक्ष दिले जाते.** | **जिल्हा अभियान व्यवस्थापक (DMM)** | |
| 3. | लेखा विषयक बाबी | **1 आठवडे** | **सहायक लेखाधिकारी** | |
| 4. | आस्थापना विषयक बाबी | **2 आठवडे** | **वरिष्ठ सहायक** | |

**(चार)**
**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (चार)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयातील नमुन्यामध्ये कामाचे प्रकटीकरण**

| अ.क्रं. | काम | कामाचे स्वरुप | आर्थिक लक्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **कार्य सेवा विषयक** | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा लाभ देणे | **ऑनलाईन लाभ दिला जातो.** | **शासन निर्णय व परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते.** |
| | | **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM)** अंतर्गत दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी ग्रामीण गरीबांना एकत्र आणून, त्यांच्या सक्षम संस्था उभारणे, सदर संस्था मार्फत गरीबांना वित्तीय सेवा पुरवणे, गरीबांची व त्यांच्या संस्थाची क्षमता वृध्दी व कौशल्यवृध्दी करणे आणि शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करुन देऊन त्यांना दारिद्र्याच्या बाहेर येण्यासाठी मदत करणे. | **ऑनलाईन लाभ दिला जातो.** | **शासन निर्णय व परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येते.** |

**(पाच)**
**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (पाच)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयातील काम पुर्ण होण्यासाठी प्रत्येक कामाची कालमर्यादा**

| अ.क्रं. | काम/कार्य | दिवस/तास पूर्ण करण्यासाठी | जबाबदार कर्मचारी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| 1 | **ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा लाभ देणे** | 6 महिने ते 1 वर्ष | विस्तार अधिकारी /शाखाअभियंता / प्रोग्रामर/ डाटा एन्ट्री ऑपरेटर | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर |
| 2 | **स्वयं सहायता समूह योजनेची (MSRLM) अंमलबजावणी करणे** | जिवनचक्रा नुसार समूह स्थापनेपासून 30 महिने कालावधी करिता विशेष लक्ष दिले जाते. | जिल्हा अभियान व्यवस्थापक (DMM) | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर तथा सह संचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, छत्रपती संभाजीनगर |
| 3 | **आस्थापना विषयक बाबी** | 2 आठवडे | आस्थापना शाखा वरिष्ठ सहायक | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर |
| 4 | **लेखा विषयक बाबी** | 1 आठवडा | लेखा शाखा सहायक लेखाधिकारी | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर |

**(सहा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (सहा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील कामाशी संबंधित नियम/अधिनियम**

1. शासन निर्णय व शासन परिपत्रकानुसार नियमानसार कार्यवाही करण्यात येते

**(सात)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (सात)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील दस्तऐवजाची वर्गवारी**

| अ.क्रं. | विषय | दस्तऐवजाचा प्रकार (नस्ती,नोंदवही ई.) | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | **विविध विषयाच्या संबंधात शासनाचे नस्ती स्थाई आदेश, शासन निर्णय, परिपत्रके ई.** | नस्ती | कायमस्वरुपी |
| 2 | **नियम / अधिनियम** | पुस्तके | कायमस्वरुपी |
| 3 | **आवक / जावक नोंदवही** | नोंदवही/रजिस्टर | कायमस्वरुपी |
| 4 | **मा.आयुक्त व लेखा परिक्षण आक्षेप अनुपालन** | नस्ती | 30 वर्ष |
| 5 | **न्यायालयीन प्रकरण** | नस्ती | कायम |
| 6 | **कर्मचा-यांच्या मूळ सेवा पुस्तिका व वैयक्तिक संचिका** | नोंदवही/रजिस्टर | 30 वर्ष |
| 7 | **दौरा दैनंदिनी व संभाव्य दौरा कार्यक्रम** | नस्ती | 05 वर्ष |
| 8 | **सेवा निवृत्ती लाभाची नस्ती** | नस्ती | 10 वर्ष |
| 9 | **रजा लेखा, भ.नि.नि.अग्रिम** | नस्ती | 05 वर्ष |

**(आठ)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (आठ)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाच्या परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था**

1. अशा प्रकारची कार्यपध्दती अस्तित्वात नाही.

**(नऊ)**

## केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (नऊ)

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाच्या समितीची यादी प्रसिध्द करणे**

| अ.क्रं. | समितीचे नांव | समिती सदस्य संख्या | किती वेळा घेण्यात येते | सभा जन सामान्यासाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यृत्तांत |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (**दिशा**) **(DISHA)** | जिल्हयातील वरिष्ठ खासदार मा.अध्यक्ष, मा.सह-अध्यक्ष, सर्व मा.आमदार व केंद्र शासनाच्या योजनांची अंमलबजावणी करणा-या संबंधित कार्यान्वीन यंत्रणा | दर तीन महिण्यास एक बैठक (वर्षातून चार वेळा) | नाही | आहे |
| 2 | **कार्यकारी समिती** | 26 | दर महा बैठक | नाही | आहे |
| 3 | **नियामक मंडळ** | 17 | दर तीन महिण्यास एक बैठक | नाही | आहे |
| 4 | **जिल्हास्तरीय समन्वय समिती** (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान-MSRLM) | 09 | दर दोन महिण्यास एक बैठक | नाही | आहे |
| 5 | **नियंत्रक समिती** (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान-MSRLM) | 09 | दर दोन महिण्यास एक बैठक | नाही | आहे |
| 6 | **कार्यकारी समिती** (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान-MSRLM) | 09 | दर दोन महिण्यास एक बैठक | नाही | आहे |

**(दहा)**
**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (दहा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे नांवे**

| अ.क्रं. | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पदनाम | वर्ग | रुजू दिनांक |
|---|---|---|---|---|
| 1 | **श्री.अशोक एम.सिरसे** | प्रकल्प संचालक | 01 | 19 जुलै 2023 |
| 2 | **श्री.उल्हास डी.खळेगांवकर** | सहायक प्रकल्प संचालक | 02 | 07 मार्च 2024 |
| 3 | **रिक्त पद** | शाखा अभियंता | 03 | -- |
| 4 | **श्री.अनिल डी.गारडे** | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | 03 | 13 मे 2022 |
| 5 | **श्री.अण्णा पी.थोरात** | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | 03 | 01 डिसेंबर 2022 |
| 6 | **रिक्त पद** | सहायक लेखाधिकारी | 03 | -- |
| 7 | **रिक्त पद** | वरिष्ठ सहायक | 03 | -- |
| 8 | **श्री.ज्ञानेश्वर एस.सोनवणे** | कनिष्ठ सहायक | 03 | 01 जून 2020 |

**(अकरा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (अकरा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनाची माहिती**

| अ.क्रं. | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पदनाम | वर्ग | वेतनश्रेणी | | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **श्री.अशोक एम.सिरसे** | प्रकल्प संचालक | 01 | S-25 | 78800-209200 | 112400/- |
| 2 | **श्री.उल्हास डी.खळेगांवकर** | सहायक प्रकल्प संचालक | 02 | S-23 | 67700-202600 | 82400/- |
| 3 | **रिक्त पद** | शाखा अभियंता | 03 | -- | -- | -- |
| 4 | **श्री.अनिल डी.गारडे** | कनिष्ठ प्रशासन अधिकारी | 03 | S-13 | 35400-112400 | 44900/- |
| 5 | **श्री.अण्णा पी.थोरात** | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | 03 | S-15 | 41800-132300 | 54600/- |
| 6 | **रिक्त पद** | सहायक लेखाधिकारी | 03 | -- | -- | -- |
| 7 | **रिक्त पद** | वरिष्ठ सहायक | 03 | -- | -- | -- |
| 8 | **श्री.ज्ञानेश्वर एस.सोनवणे** | कनिष्ठ सहायक | 03 | S-8 | 25500-81100 | 54600/- |

**(बारा)**
**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम — 2005 कलम (4)1 ब (बारा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील मंजूर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशिल याची माहिती**

| अंदाजपत्रकीय लेखाशिर्ष | योजनेचे / कामाचे नांव प्रत्यक्ष खर्च | आर्थिक तरतूद (अपेक्षित) |
|---|---|---|
| (MSRLM)<br>(स्वयं सहाय्यता समुह) | प्राप्त - लक्ष<br>खर्च - लक्ष | 0.0 लक्ष |

**(तेरा)**

## केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (तेरा)

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती

1. केंद्र व राज्यपुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनेतील लाभार्थ्यांना ऑनलाईन PFMS व्दारे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये अनुदान वाटप करण्यात येते.

**(चौदा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (चौदा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील मिळणा-या परवाना याची चालू वर्षाची तपशीलवार माहिती**

1. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाकडून लाभार्थ्यांना परवाना देण्याची योजना नाही.

**(पंधरा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (पंधरा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयाच्या माहितीचे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात माहिती प्रकाशित करणे**

1. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनेची माहिती वेब साईट व ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**(सोळा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (सोळा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील उपलब्ध सुविधांचा तक्ता प्रसिध्द करणे**

| अ.क्रं. | सुविधाचा प्रकार | वेळ | कार्यपध्दती | ठिकाण | जबाबदार व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **कार्यालय प्रमुखांना भेटण्याची वेळ** | मुख्यालय दिवशी **(सोमवार व शुक्रवार)** सकाळी 10.00 ते 11.00 व दुपारी 4.00 ते 5.30 | प्रत्यक्ष | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर | प्रकल्प संचालक |

**(सतरा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (सतरा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी, सहाय्यक जन माहिती अधिकारी यांची माहिती**

| अ.क्रं. | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पदनाम | प्रकार | कार्यक्षेत्र | फोन व इमेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **श्री.अशोक एम.सिरसे** | प्रकल्प संचालक | प्रथम अपिलीय अधिकारी | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर तथा सह संचालक, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, **(MSRLM)** | 0240-2994268 **Email :-** 1) abdprodir @ rediffmail. com 2)aurangabaddmmu @gmail.com |
| 2 | **श्री.उल्हास डी.खळेगांवकर** | सहायक प्रकल्प संचालक | जन माहिती अधिकारी | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर | 0240-2994268 **Email :-** abdprodir @ rediffmail. com |
| 3 | **श्री.विक्रम सरगर** | जिल्हा अभियान व्यवस्थापक (DMM) | जन माहिती अधिकारी (DMM) | जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, **(MSRLM)** | 0240-2994268 **Email :-** aurangabaddmmu @gmail.com |
| 4 | **श्री.यशवंत शिंदे** | सहायक लेखाधिकारी (प्रभारी) | सहाय्यक जन माहिती अधिकारी | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर | 0240-2994268 **Email :-** abdprodir @ rediffmail. com |
| 5 | **श्री.गायंगी एस.आर** | वरिष्ठ सहायक (प्रभारी) | सहाय्यक जन माहिती अधिकारी | जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर | 0240-2994268 **Email :-** abdprodir @ rediffmail. com |

**(अठरा)**

**केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005 कलम (4)1 ब (अठरा)**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील प्रकाशित माहिती**

1. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची अदयावत माहिती संबंधित योजनांच्या पोर्टलवर व वेबसाईटवर नियमित उपलब्ध आहे.

## प्रस्तावना

## केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम – 2005

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश 2002 पारित केला होता. हा अध्यादेश पारित करण्यामागे शासन कारभारात पारदर्शकता असावी व शासकीय यंत्रणेची जबाबदार प्रशासन म्हणून प्रतिमा तयार करण्याकरिता तसेच शासनाच्या विविध लोकाभिमुख उपक्रमांची / योजनांची जनतेस जास्तीत जास्त माहिती मिळावी असा उददेश होता. अस्तित्वात असलेल्या 2002 च्या या कायदयामध्ये थोडाफार बदल होऊन केंद्रीय माहितीचा अधिकारअधिनियम -2005 ऑक्टोंबर मध्ये अंमलात आला असल्याने महाराष्ट्र माहितीचा अधिकाार अधिनियम 2005 अधिक्रमीत झालेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम - 2005 याकायदयाच्या अंमलबजावणीमुळे शासकीय / निमशासकीय यंत्रणावर चांगलेनियंत्रण आले आहे. तसेच या कायदयामुळे शासकीय कामकाज कशा पध्दतीने होत आहे. शासनाच्या जनकल्याणाच्या विविध योजनांची अंमलबजावणी कशा पध्दतीने होते. त्यातील विविध स्तरावरील टप्पे/प्रक्रिया याचीही माहिती सर्व सामान्य जनतेला खुली होणार आहे. तसेच शासनाचा कारभार जसजसा पारदर्शक होत जाईल तसतशी जनतेच्या मनातील संदिग्धता कमी होत जाईल. तसेच दप्तर दिरंगाई आणि भ्रष्टाचार यालाही आपोआपच आळा बसेल.


या कायदयामुळे शासकीय यंत्रणा आणि जनता यांचेमध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण होईल. सदरचा कायदा जनतेच्या हितासाठी व कल्याणासाठी केला असल्याने, शासन जनतेचे हित डोळयापुढे ठेवून कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी करीत आहे. याचा परिणाम म्हणून कामकाजात गुणवत्तेला प्राधान्य दिले जात आहे व त्याप्रमाणे गुणवत्ता राखली जात आहे.

सदर केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम-2005 मधील 4(1)(ब) अन्वये प्रत्येक विभागाचे 17 बाबीवरील माहिती प्रसिध्द करावयाची असून त्या अनुरोधाने प्रस्तुत पुस्तिकेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयाची माहिती विशद करण्यात आली आहे. या माहितीमुळे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयाच्या कारभारात पारदर्शकता, खुलेपणा व जबाबदारी जाणीव आणणे सुलभ झालेले आहे. लोकशाही समाज व्यवस्थेमध्ये जनतेच्या प्रभावी सहभागाची सुनिश्चिती होत आहे. जनतेने यातील माहितीचा उपयोग करुन घ्यावा तसेच सदर माहिती त्यांना निश्चितच योग्य मार्गदर्शक व उपयुक्त ठरावी, असा मी दृढविश्वास व्यक्त करतो.

हया अधिनियिमाच्या योग्य वापराने शासन व प्रशासनामध्ये पारदर्शकता निर्माण होईल. प्रशासनात गतिमानता निर्माण होईल आणि लोकाभिमुख कार्यक्रम प्रभावीपणे राबवले जातील, हे निश्चित.

**प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर**

# ORGANISATION CHART



20

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासकिय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 कलम 8 मधील तरतुदीनुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर.

**नागरीकांची सनद प्रसिध्द करीत आहे.**

## नागरीकांची सनद

**प्रस्तावना**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर या कार्यालयामार्फत केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) स्वयं सहाय्यता समुह या योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2009 मधील तरतुदीनुसार जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालय नागरीकांची सनद प्रसिध्द करीत आहे. या खात्याशी संबंधित असणा-या सेवा तत्परतने सौजन्यपुर्वक व सन्मानपुर्वक नागरीकांना उपलब्ध करुन देण्यासाठी हे कार्यालय बांधील आहे.

2) **जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाची रचना**

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे कार्यकारी अध्यक्ष आहेत. मा.प्रकल्प संचालक हे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे कार्यालय प्रमुख आहेत. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील कर्मचा-यांकडे विषयांची विभागणी करण्यात आली आहे. (सोबत परिशिष्ट 1 जोडले आहे.)

3) **कार्यपुर्तीचे वेळापत्रक**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयामार्फत पुरविण्यात येणा-या सेवांच्या कार्यपुर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट 1 मध्ये सादर करण्यात आलेले आहे.

**4.अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण**

कार्यपुर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गा-हाणी असल्यास त्यासंबंधी परिशिष्ट 1 मधील स्तंभ क्रमांक 5 मध्ये नमुद केलेल्या अधिका-याकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासुन 7दिवसात त्याची पुर्तता करण्याची जबाबदारी संबंधित अधिका-याची राहील. यानंतर नागरीकांचे समाधान न झाल्यास संबंधित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.तथा अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर यांचेकडे

याबाबत त्यांना तक्रार करता येईल.गा-हाणी समक्ष भेटीने किंवा पत्राने मांडता येतील.

**ब) जनसामान्यांकडुन सुचना**

ही नागरीकांची सनद सर्वसामान्यनागरीकांच्या छानणीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरीकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करुन त्यशत वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालयाचे अधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरीकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

**5) नागरीकांच्या सनदेची अंमलबजावणी**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालय नागरीकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटीबध्द आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा छत्रपती संभाजीनगर कार्यालय आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरवितांना नागरीकांना सौजन्यपूर्ण वागणुक देण्याची विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचा-यांची राहील.

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण क्रं.3 च्या कलीम 10 (1) मधील तरतुदीस अनुसरुन तात्काळ नस्ती शक्यतो त्याच दिवशी किंवा दुस-या दिवशी अति तातडीच्या स्वरुपाची नस्ती शक्यतो 4 दिवसांत निकाली काढण्यात येईल. अन्य विभागाशी संबंधित असलेल्या नस्ती 45 दिवसांच्या आत व दुस-या विभागाशी बाब अंतर्भुत असलेल्या व त्या विभागाचे अभिप्राय आवश्यक असलेल्या नस्तीवर 3 महिण्याच्या आत निर्णय घेऊन योग्य कार्यवाही करण्यात येईल.